IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# विधानसभा अध्यक्ष आणि राज्यपाल पदाची घटनात्मक उपयुक्तता : केंद्र–राज्य संघर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र व तामिळनाडूतील घटनात्मक पदांच्या गैरवापराचा अभ्यास

[1]सुमंत तुकाराम शिंदे, [2]प्रा.डॉ.मेघराज एकनाथ औटी
सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*विधानसभा अध्यक्ष, राज्यपाल, संघराज्यवाद, केंद्र–राज्य संघर्ष, पक्षांतर बंदी कायदा, महाराष्ट्र, तामिळनाडू*

**ABSTRACT**

भारतीय राज्यघटनेत विधानसभा अध्यक्ष व राज्यपाल ही दोन पदे विधिमंडळाची शिस्त, शासनाची सातत्यता आणि संघराज्यीय समतोल राखण्यासाठी निर्माण करण्यात आली आहेत. तथापि, अलीकडील काळात केंद्र–राज्य संघर्ष तीव्र होत असताना या पदांचा राजकीय प्रभावाखाली पक्षपाती व घटनाबाह्य वापर होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. विशेषतः महाराष्ट्र व तामिळनाडू या राज्यांतील घटनांमधून राज्यपाल व विधानसभा अध्यक्षांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या शोध निबंधात या पदांची घटनात्मक उपयुक्तता, अधिकार व मर्यादा, पक्षांतर बंदी कायद्याचे विश्लेषण, सर्वोच्च न्यायालयाची भूमिका तसेच संभाव्य सुधारणांचा अभ्यास करण्यात आला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Shinde, S. T., & Auti, M. E. (2026). विधानसभा अध्यक्ष आणि राज्यपाल पदाची घटनात्मक उपयुक्तता : केंद्र–राज्य संघर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र व तामिळनाडूतील घटनात्मक पदांच्या गैरवापराचा अभ्यास. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 966–969.

## 1. प्रस्तावना

भारतीय संविधानाने स्वीकारलेली संघराज्यीय शासनपद्धती केंद्र व राज्य यांच्यातील अधिकारसंतुलनावर आधारित आहे. या संतुलनात काही घटनात्मक पदे तटस्थ व निष्पक्ष राहतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. विधानसभा अध्यक्ष आणि राज्यपाल ही अशीच महत्त्वाची पदे असून लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र प्रत्यक्ष व्यवहारात या पदांचा राजकीय हेतूंसाठी वापर होत असल्याचे चित्र समोर येत आहे.प्रस्तुत शोध निबंधात या पदांच्या अलीकडील हस्तक्षेपाच्या घटनांचा परामर्श घेण्यात आला आहे

## 2. संशोधनाची उद्दिष्टे

1. विधानसभा अध्यक्ष व राज्यपाल पदांची घटनात्मक भूमिका समजून घेणे.
2. केंद्र–राज्य संघर्षात या पदांच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.
3. महाराष्ट्र व तामिळनाडूतील घटनांच्या आधारे गैरवापराचा अभ्यास करणे.
4. सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपाचे मूल्यमापन करणे.
5. घटनात्मक सुधारणा व उपाययोजना सुचवणे.

## 3. संशोधन पद्धती

हा अभ्यास वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने करण्यात आला आहे. यामध्ये भारतीय राज्यघटना, दहावी अनुसूची (पक्षांतर बंदी कायदा), सर्वोच्च न्यायालयाचे निकाल, शासकीय कागदपत्रे व दुय्यम साहित्याचा आधार घेतला आहे.

### 3.1 संशोधन गृहितके (Hypotheses)

1. विधानसभा अध्यक्ष व राज्यपाल ही पदे घटनात्मकदृष्ट्या तटस्थ असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्यांचा राजकीय वापर वाढलेला आहे.
2. पक्षांतर बंदी कायद्याची अंमलबजावणी विधानसभा अध्यक्षांच्या पक्षपाती व विलंबकारी भूमिकेमुळे दुर्बल झाली आहे.
3. राज्यपालांचा वाढता हस्तक्षेप संघराज्यीय तत्त्वांना बाधा पोहोचवतो.
4. महाराष्ट्र व तामिळनाडूतील घटनांमधून घटनात्मक नैतिकतेचा ऱ्हास स्पष्टपणे दिसून येतो.

## 4. विधानसभा अध्यक्ष : घटनात्मक उपयुक्तता

विधानसभा अध्यक्ष हे राज्य विधिमंडळाचे प्रमुख असतात. सभागृहाचे कामकाज शिस्तबद्धपणे चालवणे, नियमांचे पालन करवून घेणे आणि लोकशाही परंपरा जपणे ही त्यांची मुख्य जबाबदारी आहे. परंतु विधानसभा अध्यक्ष पंचांची भूमिका पार न पाडता सक्रीय राजकीय भूमिका घेताना दिसतात

- **विधानसभा अध्यक्षांची वाढती हस्तक्षेप भूमिका**

(अ) घटनात्मक स्थान

कलम 178 : विधानसभा अध्यक्ष

सभागृहाचे निष्पक्ष संरक्षक (Impartial Presiding Officer)

(ब) हस्तक्षेपाची क्षेत्रे

1. पक्षांतर बंदी कायद्यात (10वी अनुसूची) पक्षपाती भूमिका

अपात्रतेचे निर्णय विलंबाने देणे

सत्ताधारी गटाला फायदा होईल अशी भूमिका

2. व्हिप व मतदानात दडपशाही

आमदारांचे स्वतंत्र मताधिकार कमी

(क) महत्त्वाचे न्यायालयीन निर्णय

Kihoto Hollohan (1992) : अध्यक्षांचा निर्णय न्यायालयीन पुनरावलोकनास पात्र

Keisham Meghachandra (2020) :

अपात्रता प्रकरणे ३ महिन्यांत निकाली काढावीत

### 4.1 पक्षांतर बंदी कायदा : विश्लेषण

1985 मध्ये 52 व्या घटनादुरुस्तीने दहावी अनुसूची लागू करण्यात आली. या कायद्याचा उद्देश लोक प्रतिनिधींनी, निवडून आल्यावर पक्ष बदलने, सरकार अस्थिर करणे, राजकीय भ्रष्टाचार रोखणे तसेच आमदारांच्या पक्षांतराला आळा घालणे हा होता. मात्र अपात्रतेबाबत निर्णय देण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांना दिल्यामुळे या कायद्याचा गैरवापर होऊ लागला. अनेक वेळा निर्णय जाणीवपूर्वक विलंबित ठेवून सत्ताधारी पक्षाला फायदा करून देण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्षांनी वेळबद्ध व निष्पक्ष निर्णय द्यावेत असे वारंवार स्पष्ट केले आहे.

## 5. राज्यपाल : घटनात्मक स्थान आणि अधिकार

कलम १५५ नुसार राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपती करतात राज्यपाल हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधी असून त्यांची भूमिका मुख्यतः औपचारिक आहे. तथापि, मुख्यमंत्री नियुक्ती, विधानसभेचे अधिवेशन बोलावणे व विधेयकांवर निर्णय घेणे या बाबतीत त्यांना विवेकाधिकार आहे.परंतु अलीकडच्या  काळात राज्यपाल हा विवेकाधिकार न वापरता राजकीय भूमिका घेताना दिसतात व निवडून आलेल्या राज्यसरकारच्या कामात हस्तक्षेप करतात.

- **हस्तक्षेपाचे प्रमुख क्षेत्र**

1. सरकार स्थापनेत हस्तक्षेप
बहुमत चाचणी विलंबित करणे / विशिष्ट पक्षाला संधी देणे
S.R. Bommai (1994) : बहुमत ठरवण्याचा अधिकार सभागृहालाच
2. विधेयकांना मंजुरी देण्यात विलंब
विधेयक राष्ट्रपतींकडे राखून ठेवणे किंवा स्वाक्षरी न करणे
Tamil Nadu व Kerala राज्यांत राज्यपाल–सरकार संघर्ष
3. मंत्रिमंडळाच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष
प्रशासकीय निर्णयांवर सार्वजनिक टीका
हे घटनात्मक शिष्टाचाराचे उल्लंघन

## 6. केंद्र–राज्य संघर्ष आणि पदांचा गैरवापर

### 6.1 महाराष्ट्राचा अनुभव

महाराष्ट्रात तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी विधानपरिषदेतील 12 आमदारांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती दीर्घकाळ न करणे ही गंभीर घटनात्मक बाब ठरली. यामुळे लोकशाही प्रतिनिधित्व बाधित झाले. तसेच विधानसभा अध्यक्षांनी पक्षांतर बंदी कायद्यांतर्गत निर्णय घेताना घटनात्मक तरतुदींचा चुकीचा वापर केला व निर्णय विलंबित ठेवले. या सर्व प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला.

### 6.2 तामिळनाडूचा अनुभव

तामिळनाडूमध्ये राज्यपाल आर. एन. रवी (R. N. Ravi) व राज्य सरकार यांच्यात तीव्र संघर्ष दिसून आला. राज्य विधानसभेने मंजूर केलेल्या अनेक विधेयकांवर राज्यपालांनी दीर्घकाळ निर्णय घेतला नाही. या संदर्भात राष्ट्रपतींनी अनुच्छेद 143 अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाला प्रश्न विचारले. या प्रकरणामुळे राज्यपालांच्या अधिकारांची सीमा व संघराज्यीय संतुलनाचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला.

## 7. सर्वोच्च न्यायालयाची भूमिका

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की राज्यपालांनी अत्यंत मर्यादित परिस्थितीतच विवेकाधिकार वापरावा आणि विधानसभा अध्यक्षांनी पक्षांतर प्रकरणात वेळेत निर्णय द्यावा. न्यायालयाने संघराज्यवाद व घटनात्मक नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.तथापि सर्वोच्च न्यायालय अशा घटनात्मक पेच प्रसंगांची ,खटल्यांची सुनावणी वेळेत घेत नसल्यामुळे सरकार बेकायदेशीरपने चालवण्याची व अपात्र असतानाही कार्यकाल पूर्ण करण्याची संधी भ्रष्ट लोकांना मिळते व जनतेचा

न्यालायैन व्यवस्थेवरचा विश्वास कमी होत असल्याची जाणीव होत आहे

**8. विश्लेषण**

या अभ्यासातून असे स्पष्ट होते की घटनात्मक पदांची रचना योग्य असली तरी राजकीय हस्तक्षेपामुळे त्यांची विश्वासार्हता कमी होत आहे. हे लोकशाहीसाठी धोकादायक ठरत आहे.

**9. निष्कर्ष**

विधानसभा अध्यक्ष व राज्यपाल ही पदे भारतीय लोकशाहीची आधारस्तंभ आहेत. मात्र त्यांचा राजकीय गैरवापर झाल्यास केंद्र–राज्य संघर्ष तीव्र होतो व लोकशाही मूल्यांना धक्का बसतो. महाराष्ट्र व तामिळनाडूतील उदाहरणे हे स्पष्टपणे दर्शवतात.

**10. सुधारणा व उपाययोजना**

1. राज्यपाल नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता व सल्लामसलत अनिवार्य करणे.
2. पक्षांतर प्रकरणांत अध्यक्षांसाठी निश्चित कालमर्यादा ठरवणे.
3. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करणे.
4. घटनात्मक नैतिकतेवर आधारित आचारसंहिता तयार करणे.

**संदर्भ**

1. ऑस्टिन, ग्रॅनव्हिल. The Indian Constitution: Cornerstone of a Nation. Oxford University Press, New Delhi.
2. बक्षी, उपेंद्र. The Indian Supreme Court and Politics. Eastern Book Company, Lucknow.
3. जैन, एम. पी. Indian Constitutional Law. LexisNexis, New Delhi.
4. कश्यप, सुभाष. Our Constitution: An Introduction to India’s Constitution and Constitutional Law. National Book Trust, New Delhi.
5. सीर्वई, एच. एम. Constitutional Law of India. Universal Law Publishing, New Delhi.
6. दिक्षित, रमेश. भारतीय राज्यघटना : तत्त्वे आणि व्यवहार (मराठी). कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
7. पाटील, य. दि. भारतीय शासन आणि राजकारण (मराठी). फडके प्रकाशन, कोल्हापूर.
8. भारत सरकार. भारताचे संविधान. विधी व न्याय मंत्रालय, नवी दिल्ली.
9. सर्वोच्च न्यायालयाचे निवडक निर्णय – S.R. Bommai v. Union of India, Nabam Rebia v. Deputy Speaker इ.